


दैनिक

अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : १०६
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.com
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, गुरुवार, दि.२८ नोव्हेंबर २०२४


## होय ! आता मुख्यमंत्री भाजपचाच होणार...

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२७, मुंबई :** महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर राज्यात मुख्यमंत्री पदावरून मोठा पेच निर्माण झाला होता. काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे मुख्यमंत्री पदासाठी अडून बसल्याचे वृत्त होते. या पदावरून देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांच्यात रस्सीखेच सुरू असल्याचंही म्हटलं जातं होतं. मात्र, या सर्व चर्चांवर एकनाथ शिंदे यांनी अखेर खुलासा केला आहे. मी नाराज नसून आम्ही रडणारे नसून लढणारे आहोत. तसंच, मुख्यमंत्री पदाचा निर्णय भाजपाने घ्यावा, तोच निर्णय आमच्यासाठी अंतिम असेल असं एकनाथ शिंदे यांनी आज स्पष्ट केलं. आज त्यांनी ठाण्यातील त्यांच्या निवासस्थानी पत्रकार परिषद घेऊन त्यांची मुख्यमंत्री पदाबाबतची भूमिका स्पष्ट केली.




राज्यात मुख्यमंत्री पदाचा पेच निर्माण झाला होता. भाजपाने सर्वाधिक जागा जिंकल्या असल्या तरीही ही निवडणूक एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्त्वाखाली झाल्याने त्यांनी अडीच वर्षे मुख्यमंत्री पद मागितल्याची चर्चा होती. दरम्यानच्या काळात अनेक चर्चा समोर येऊ लागल्या. एकनाथ शिंदेंना उपमुख्यमंत्री करणार किंवा केंद्रात कॅबिनेट पद देणार किंवा श्रीकांत शिंदेंना उपमुख्यमंत्री करणार, अशा चर्चांमुळे राज्यातील राजकीय वातावरणात संभ्रमता निर्माण झाली होती. निकाल लागल्याच्या चार दिवसांनंतरही मुख्यमंत्री ठरत नसल्याने सामान्य नागरिकांनी रोष व्यक्त केला. दरम्यान, आता एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्री पदाचा चेंडू थेट भाजपाच्या वरिष्ठ पातळीच्या कोर्टात टाकला आहे. म्हणजेच, त्यांनी मुख्यमंत्री पदाच्या शर्यतीतून माघार घेतल्याची चर्चा आता सुरू झाली आहे. असं असलं तरीही राज्यात उपमुख्यमंत्री आणि मंत्रिमंडळाचा प्रश्न अनुत्तरीतच आहे. यावरही त्यांनी भाष्य केलं.

**मोदींनी घेतलेला निर्णय मान्य असेल**

एकनाथ शिंदे म्हणाले, राज्यात आमचं बहुमताचं सरकार आलं आहे. तुम्ही प्रसारमाध्यमं आम्हाला विचारताय की सत्तास्थापनेचं घोडं कुठे अडलंय? मला तुमच्यासह राज्यातील जनतेला सांगायचं आहे की घोडं कुठेही अडलेलं नाही. मी मनमोकळा माणूस आहे. मी कुठेही काहीही धरून ठेवलेलं नाही. मी कुठलीही गोष्ट ताणून धरणारा माणूस नाही. मला इतर सर्व पदांपेक्षा लाडक्या बहिणींचा सख्खा लाडका भाऊ हीच ओळख पुरेशी आहे. त्यामुळे मी स्वतः काल (२६ नोव्हेंबर) पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना फोन केला. त्यांना सांगितलं की सरकार बनवताना तुम्हाला माझ्यामुळे कुठलीही अडचण येणार नाही. त्यामुळे माझ्याबद्दल मनात कुठलाही किंतू आणू नका. मागील वेळेस तुम्ही आम्हाला मदत केली. अडीच वर्षे राज्याचं नेतृत्व करण्याची संधी दिली. त्यासाठी मी आभारी आहे.

**आज दिल्लीत तिन्ही पक्षांची बैठक**

ते म्हणाले, सरकार स्थापन, उपमुख्यमंत्री आणि मंत्रिमंडळाच्या चर्चे करता उद्या दिल्लीत बैठक बोलावण्यात आली आहे. तिन्ही पक्षाचे नेते या बैठकीला उपस्थित राहणार आहेत. या बैठकीतच सर्व मुद्द्यांवर चर्चा होईल.

## डहाणूतील सारणी येथील गर्भवती महिलेसह बाळाचा उपचाराअभावी मृत्यू...




माझ्या पत्नीला प्रशुती वेदना होत असल्याने आम्ही कासा रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले मात्र तिला पुढील उपचारासाठी सिल्वासा येथे पाठवले. एक तासापेक्षा जास्त उशीर होऊन ही रुग्णवाहिका आली नाही त्यानंतर तिला उशीराने सिल्वासा नेत असताना तिचा रस्त्यात मृत्यू झाला. रुग्णवाहीका वेळेत पोहचली असती तर माझ्या पत्नी आणि गर्भातील बाळाचा जीव वाचला असता.
**– गणेश डोंगरकर (मृत पिंकीचा पती)**

**हीच आहे का लाडकी बहीण योजना ? – आ. विनोद निकोले**

पालघर जिल्ह्यात रुग्णवहिनीच्या व्यवस्थेच्या हलगर्जीपणामुळे एका गरोदर मातेचा व बाळाचा मृत्यू होतो ही बाब अत्यंत खेदजनक असून यासंदर्भात यापूर्वी विधिमंडळामध्ये आम्ही प्रश्न उपस्थित केला होते. आता मतदारांनी मला पुन्हा संधी दिली आहे. याबाबत पुन्हा विधिमंडळात या गंभीर विषयाचा आवाज उठवून याविषयी ठोस पावले उचलायला सरकारला भाग पडणार.

**अक्षराज : निलेश कासट**

**दि.२७, डहाणू (पालघर) :** पालघर जिल्ह्यातील आरोग्य व्यवस्थेतील त्रुटी पुन्हा एकदा समोर आल्या आहेत. पालघर निर्मिती ला एक दशक पूर्ण झाले आहे. मात्र जिल्ह्यातील आरोग्य व्यवस्था जैसे थे पाहायला मिळत आहे. एका बाजूला सरकार लाडकी बहीण योजना सारखी आणून बहीणीच्या पाठीशी असल्याचे जाहिरातबाजी करून सांगत असताना, याच लाडकी बहीणीचा अपुऱ्या आरोग्य सुविधेमुळे जीव जात आहे. त्यामुळे लाडकी बहीण योजनेपेक्षा आम्हाला चांगल्या आरोग्य सुविधा द्या अशी मागणी महिला करताना दिसतात. डहाणू तालुक्यातील सारणी गावातील पिंकी डोंगरकर वय वर्ष २६ या गर्भवती महिलेचा आणि तिच्या गर्भातील बाळाचा उपचाराअभावी दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना उघडकीस आली आहे.

पिंकी डोंगरकर यांना प्रसूतीच्या वेदना होऊ लागल्याने तिला मंगळवारी कासा येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, प्रकृती गंभीर झाल्याने प्राथमिक उपचारानंतर त्यांना पुढील उपचारासाठी सिलवासा येथे पाठवण्याचा सल्ला डॉक्टरांनी दिला. मात्र रुग्णवाहीका वेळेवर दाखल झाली नसल्याने पिंकी ला पुढील उपचारासाठी वेळेवर दाखल करण्यास उशीर झाल्याचे तीच्या कुटूंबीयांने सांगितल.

**रुग्णवाहिकेचा विलंब: अन्यथा जीव वाचला असता..**

रुग्णवाहीका ही अनेक वेळा रुग्णांना दवाखान्यात वेळेत पोहचवून जीवदान देत असते. रुग्णांना उपचारासाठी प्रत्येक मिनिट महत्त्वाचा असतो. मात्र हीच रुग्णवाहिकेच्या विलंबामुळे पिंकी डोंगरकर यांचा जीव धोक्यात आला. तासाभरानंतर रुग्णवाहिका उपलब्ध झाली. मात्र, सिल्वास येथे पोहोचण्याआधीच, अर्ध्या रस्त्यात पिंकी डोंगरकर आणि तिच्या गर्भातील बाळाचा मृत्यू झाला.

**कुटुंबीयांची मागणी...**

या हृदयद्रावक घटनेमुळे आरोग्य व्यवस्थेतील भोंगळ कारभाराचा विदारक चित्र समोर आले आहे. पिंकी डोंगरकर यांच्या कुटुंबीयांनी दोषींवर कठोर कारवाईची मागणी केली आहे.

ही घटना पालघर जिल्ह्यातील आरोग्य व्यवस्थेतील समस्यांवर गंभीर प्रश्न उपस्थित करते. अशा घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी प्रभावी उपाययोजना करण्याची गरज निर्माण झाली आहे.

**आरोग्य व्यवस्थेतील सुधारणा कधी होणार?**

पालघर जिल्ह्यात आरोग्य व्यवस्था ही नेहमीच व्हेंटिलेटर वर असल्याचे पाहायला मिळते. जिल्हा निर्मितीनंतर दशक उलटूनही पालघर जिल्ह्यामध्ये सक्षम आरोग्य व्यवस्था नसल्याने आरोग्य व्यवस्थेचे नेहमीच दिंडवडे उडत आहेत. अनेक रुग्णांना आरोग्याच्या सेवा घेण्यासाठी नजीकच्या गुजरात राज्यातील सुरत , वलसाड तसेच सिल्वासा आदी ठिकाणी उपचारासाठी जावे लागते. रुग्णांच्या जीवाशी खेळ करणाऱ्या अशा घटना थांबण्यासाठी प्रशासन आत्तापर्यंत ठोस पावले उचललेली नाहीत, त्यामुळे अनेक रुग्ण दगावल्याच्या घटना घडलेल्या आहेत याबाबत येणाऱ्या काळामध्ये प्रशासन याबाबत काही योजना करतील का असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

## बुलढाणा जिल्ह्यात काँग्रेसच्या पराभवाने मुकुल वासनिक यांची दिल्ली दरबारी अडचण

**दि.२७, बुलढाणा :** काँग्रेसचे राष्ट्रीय नेते तथा जिल्हा काँग्रेसचे सर्वे सर्वा मुकुल वासनिक 'यांचा जिल्हा' अशी बुलढाण्याची ओळख. काँग्रेसचा वर्षानुवर्षे बालेकिल्ला राहिलेल्या बुलढाण्यात यंदाच्या निवडणुकीत काँग्रेसवर पराभवाची नामुष्की ओढवली. जिल्ह्यातील चारही जागांवर काँग्रेस उमेदवाराला दारुण पराभवाचा सामना करावा लागला. अलीकडच्या काळातील हा काँग्रेसचा सर्वात मोठा पराभव ठरला आहे. यामुळे मुकुल वासनिक यांची दिल्ली दरबारी अडचण होण्याची शक्यता आता वर्तवली जात आहे.

मूळचे नागपूरकर असलेले मुकुल वासनिक हे नागपूर विद्यापीठ निवडणूक आणि युवा चळवळीतून पुढे आलेले नेतृत्व. त्यांचे वडील बाळकृष्ण वासनिक १९८० साली राखीव असलेल्या बुलढाणा लोकसभा मतदारसंघातून काँग्रेसचे खासदार झाले. यापाठोपाठ १९८४ मध्ये मुकुल वासनिक बुलढाण्याचे खासदार झालेत. यातून त्यांनी बुलढाणा जिल्हा काँग्रेसमध्ये नियोजितपणे वर्चस्व निर्माण केले. १९८४ ते २००४ पर्यंत त्यांनी बुलढाण्यातूनच लोकसभा लढवली. तीनदा खासदारकी मिळवली. पंतप्रधान पी.व्ही. नरसिंहराव यांच्या कार्यकाळात केंद्रीय क्रीडा युवक कल्याण राज्यमंत्री झाले. यामुळे त्यांचे बुलढाण्यासोबत राजकीय,



भावनिक ऋणानुबंध राहिले व ते आजही कायम आहेत. 'मुकुल वासनिक बोले अन् जिल्हा काँग्रेस हले,' अशी स्थिती कायम असल्याने बुलढाणा जिल्हा मुकुल वासनिक यांचा, अशी ओळख काँग्रेस मुख्यालयात निर्माण झाली आहे. यंदाच्या विधासभेतही चार जागांचे उमेदवार त्यांनीच ठरवले. प्रचारादरम्यान जिल्ह्यात दोनदा हजेरी लावली. गटबाजी दूर करून सर्वांना कामाला लावले. मलकापूरमधील माजी नगराध्यक्ष हरीश रावळ, मेहकरमधील लक्ष्मण घुमरे यांचे बंड थंड केले. याउपरही जिल्ह्यात काँग्रेसला 'व्हाइटवॉश' मिळाला. एकाही जागी विजय न मिळाल्याने जिल्ह्यातून पंजाच गायब झाल्याचे चित्र आहे. काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राहुल बोन्द्रे, दिलीपकुमार सानंदा व राजेश एकडे हे दोन माजी आमदार आणि माजी आमदारांची कन्या स्वाती वाकेकर पराभूत झाल्याने पक्ष तोंडघशी पडला आहे.

## भरदिवसा घरात शिरून अज्ञात व्यक्तीने केली शिक्षकाच्या मुलाला मारहाण

**अक्षराज : राजू गागरे**

**दि.२७, झरी (यवतमाळ) :** झरी तालुक्यातील पिंप्रडवाडी येथे भर दिवसा घरात शिरून अज्ञात व्यक्तीने मारहाण केली आहे. एवढेच नव्हे तर मेहनतीने खर्च लावून वेचलेला कापुस पेटवून दिला आहे. ही घटना २७ नोव्हेंबर वेळ ४ ते ५ वाजताच्या दरम्यान घडली असल्याचे सांगितले जात आहे.



पिप्रडवाडी येथील घडलेल्या या घटनेत अज्ञात आरोपीने जाणुन बुजून अंधश्रद्धे बद्दल भीती पसरवीण्याचा या आधी प्रयत्न झाला असल्याचे समोर आले आहे. या बद्दल स्वतः वामन जानकीराम वाघाडे शिक्षक यांनी माहिती दिली आहे. या घटनेत या आधी घराच्या पायरीवर हळद कुंकू ने भरलेला निंबू ठेवने भींतीवरून उडी मारून येने असा काही प्रकार आठ दिवस चालला. या प्रकरणी असा प्रकार करणारा अज्ञात व्यक्ती कोण सस्पेन्स राहिले आहे. परंतु २७ नोव्हेंबर रोजी घडलेल्या घटनेत भर दिवसा आजुबाजुला कुणी नसल्याची संधी साधून घरात शिरून कापुस पेटवून दिला. एवढ्यावरच न थांबता शिक्षकाच्या मुलाला डोक्यावर मारहाण सूद्धा केल्याचा प्रकार घडला आहे. मारहाण करते वेळी अज्ञात आरोपीने चेहर्यावर कापडाचे काळ्या रंगाचे दुपट्याचै मास्क लावून घटनेला अंजाम दिला त्यामुळे अज्ञात व्यक्तीची ओळख घटनेतील मार लागलेल्या शिक्षकाच्या मुलालाही पटली नाही. या प्रकाराबद्दल मुकूटबन पोलिस स्टेशन येथे तक्रार दाखल केली असून. घटनास्थळी पोलिस दाखल झाले असून संपूर्ण घटनेचा तपास करीत आहेत. परंतु तालुक्यात दुर्भा येथील घटना ताजी असताना असा पुन्हा प्रकार घडने म्हणजे गुन्ह्यात वाढ झाल्याचे चित्र आहे.

## लंकेच्या अनपेक्षित पराभवाचा कार्यकर्त्यांना धक्का ! कार्यकर्त्यांना धीर देण्यासाठी खा.निलेश लंकेंचा संवाद मेळावा

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२७, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्याचा विधानसभा निवडणुकीचा निकाल धक्कादायक पराभव ऐकल्यावर समर्थक, कार्यकर्ते हळहळले असून अनेकांना धक्का बसला आहे. आता खासदार निलेश लंके यांचे समर्थक पराभवानंतर चिंतन करणार असून नव्या निर्धाराने आणि ठाम निश्चयाने पुन्हा भरारी घेण्याचा संकल्प करण्यात येणार आहे. रविवार दि. १ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता नगर – पुणे महामार्गावरील ग्रीन हेवन मंगल कार्यालयात निलेश लंके यांच्या सहकाऱ्यांचा मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. खासदार निलेश लंके हे यावेळी संवाद साधणार आहेत. या मेळाव्यासंदर्भात लंके समर्थकांकडून सोशल मीडियावर संदेश पाठविण्यात आले असून त्यात नमूद करण्यात आले आहे की, पारनेर नगर मतदारसंघातील महाविकास आघाडी तसेच सामाजिक संघटनेच्या सर्व कार्यकर्त्यांनी आपल्या उमेदवार राणीताई निलेश लंके यांना विजयी करण्याच्या दृष्टीने प्रयत्नांची पराकाष्ठा केली. दुर्दैवाने आपले प्रयत्न अपुरे पडले. लोकशाहीत जनतेचा कौल हा अंतिम असतो हे आपण मान्य करायला हवे. संदेशात मध्ये पुढे नमूद करण्यात आले आहे की, आपण सारे लंके परिवारावर निस्सिम प्रेम करणारे कार्यकर्ते आहोत. त्यांनी देखील आपल्या सर्वांवर असेच प्रेम केले आहे. आपल्या सर्वांमध्ये एक प्रकारचा कौटुंबिक जिव्हाळा निर्माण झाला आहे. त्यामुळे हा पराभव आपल्या सर्वांच्या जिव्हारी लागला आहे. आपल्या उमेदवार राणी निलेश लंके यांना झालेले १ लाख १२ हजार १०४ इतके मतदान म्हणजे आपल्या सर्वांचा हा विजयच म्हणावा लागेल. पराभवाने खचून न जाता भावनाविवश होऊ नका. तितक्याच ताकदीने कणखरपणे आपण नव्या आव्हानांना सामोरे जाऊया अशी साद या संदेशात घालण्यात आली आहे.



## रस्त्यांसंदर्भात खा.लंके मंत्री गडकरींच्या भेटीला !

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२७, अहिल्यानगर :** नगर दक्षिण लोकसभा मतदारसंघातील विविध रस्त्यांची कामे तसेच बहुचचत नगर–मनमाड रस्त्याच्या कामासंदर्भात खा. नीलेश लंके यांनी केंद्रीय रस्ते व महामार्ग वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेउन सविस्तर चर्चा केली. लंके यांच्या मागण्यांवर सकारात्मक निर्णय घेण्याची ग्वाही मंत्री गडकरी यांनी दिली. लोकसभा निवडणूकीपूर्वी खा. नीलेश लंके यांनी नगर–मनमाड रस्त्याच्या दुदर्शकडे लक्ष वेधले होते. नगर ते पाथड रस्त्याच्या रखडलेल्या कामासाठी त्यांनी नगर येथे उपोषण केल्यानंतर हे काम तात्काळ माग लागले होते तर नगर–मनमाड रस्त्याचे कामही माग लावण्याची ग्वाही मंत्री गडकरी यांनी दिली होती. त्यानुसार नगर–मनमाड रस्त्याच्या दुरूस्तीचे काम सध्या सुरू आहे. नगर–मनमाड रस्त्याच्या कामाची नव्याने निविदा काढण्यात येणार असून ज्या ठिकाणी आवश्यकता आहे तिथे काँक्रीटीकरणाचा रस्ता करण्याची मागणी खा. लंके यांनी केली असून मंत्री गडकरी यांनी ती स्विकारलीही आहे. या कामाबाबत खा. लंके यांनी मंत्री गडकरी यांच्याकडे काही महत्वपुर्ण बाबीही मांडल्या. मतदारसंघातील काही रस्त्यांसाठीचे प्रस्तावही खा लंके यांनी या बैठकीत सादर केले. त्या कामांबाबत गडकरी यांनी संबंधित अधिकाऱ्यांना सुचना देत पुढील कार्यवाही करण्यास सांगितल्याचे खा. लंके यांनी सांगितले. लोकसभेचे हिवाळी अधिवेशन सुरू झाले असून कामकाजाच्या पाहिल्याच दिवशी खा. नीलेश लंके हे कामाला लागले आहेत. इतर विभागासंदर्भातील प्रस्ताव सादर करण्यासाठी खा. लंके हे लवकरच मंत्र्यांची भेट घेणार असल्याचे सांगण्यात आले.

# संपादकीय



## क्रांतिसूर्य...

क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची आज (२८ नोव्हेंबर १८९०) पुण्यतिथी! सत्यशोधक समाज संस्थेद्वारे त्यांनी समाजसुधारण्याचे व स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवण्याचे काम केले.पत्नी सावित्रीबाई फुले यांच्या मदतीने समाजातील स्त्रियांना शिक्षण देण्यासाठी धडपडणाऱ्या ज्योतिबांना आज सर्वांनी त्यांच्या स्मृतीस अभिवादन करूया.

ज्योतिबांनी शेतकरी आणि बहुजन समाजाच्या समस्यांना केंद्रस्थानी ठेवून त्यावर काम केले.महात्मा ज्योतिबा फुले हे उच्च कोटीचे मानवतावादी समाजसुधारक होते. संपूर्ण आयुष्यभर त्यांनी केवळ मानवाच्या हिताचा विचार केला.जीवनात सत्याचा मूलमंत्र काया - वाचा मने जपणाऱ्या ज्योतिबांचा जन्म ११ एप्रिल १८२७ साली माळी समाजातील गोऱ्हे यांच्या घरात झाला.जनतेने त्यांना 'महात्मा' ही उपाधी १८८८ मध्ये बहाल केली.बहुजन समाजाचे अज्ञान,दारिद्र्य आणि समाजातील जातिभेद पाहून त्यांनी ही सामाजिक परिस्थिती सुधारण्याचा निश्चय केला.त्यांनी १८४८ मध्ये पुण्यामध्ये बुधवार पेठेतील भिडे यांच्या वाड्यात पहिली मुलींची शाळा काढून तेथील शिक्षिकेची जबाबदारी सावित्रीबाईंवर सोपविली.महाराष्ट्रातील स्त्रीशिक्षणाची ही मुहूर्तमेढ ठरली.तसेच अस्पृश्य मुलांसाठी त्यांनी पुण्याच्या वेताळ पेठेत १८५२ मध्ये शाळा स्थापन केली.त्यांच्या या कार्याला सनातन्यांकडून सतत विरोध होत असे.पण ज्योतीबा आपल्या भूमिकेवर ठाम असत. ज्योतिबांनी पत्नी सावित्रीबाईंना शिक्षण देऊन शिक्षणकार्यास प्रवृत्त केले.शाळेच्या मुख्याध्यापकपदी आरूढ झालेली भारतातील पहिली महिला म्हणजे सावित्रीबाई.त्याचप्रमाणे स्वतंत्रपणे फक्त स्त्रियांसाठी शाळा काढणारे महात्मा फुले हे पहिले भारतीय होते.ज्योतिबा यांनी ब्राह्मण-पुरोहित यांच्या मदतीविना विवाह-संस्कार आरंभ करवले आणि मुंबई हायकोर्टाकडून मान्यता मिळवली. ते बाल-विवाह विरोधी आणि विधवा-विवाहाचे समर्थक होते.त्यांनी दलितांच्या प्रगतीसाठी अनेक कार्य केले.दलित मुलांचे घरात पालन-पोषण केले.परिणामस्वरूप ते जातीतून बहिष्कृत केले गेले.ज्योतिबा फुले आणि त्यांचं संघटन सत्यशोधक समाजाच्या संघर्षामुळे सरकाराने एग्रीकल्चर एक्ट पास केले.'शेतकऱ्यांचे आसूड' हा महात्मा फुले यांचा प्रसिद्ध ग्रंथ होय.तत्कालीन समाजातील जातिभेद अनिष्ट प्रथा,तसेच समाजातील उच्चवर्णीयांची मक्तेदारी याविरुद्धची प्रतिक्रिया महात्मा फुले यांच्या साहित्यातून उमटलेली होती.त्याकाळच्या समाजाला प्रबोधनाची व सामाजिक परिवर्तनाची वाट दाखविण्यासाठी त्यांनी लिहिलेले ग्रंथ हे मार्गदर्शक व प्रेरणादायी ठरले.समताधिष्ठित समाजाच्या निर्मितीमध्ये महात्मा फुले यांनी मोलाचे योगदान दिलेले आहे.त्यांनी आपल्या हयातीत गुलामगिरी,तृतीय रत्न,छत्रपती शिवाजी,राजा भोसला का पखडा,किसान का कोडा,अस्पृश्य की कैफियत अशी अनेक पुस्तकेही लिहिली.महात्मा ज्योतिबा आणि त्यांच्या संघटनेच्या संघर्षामुळे सरकारने 'कृषी कायदा' मंजूर केला.धर्म,समाज आणि परपरा यांचे सत्य समोर आणण्यासाठी त्यांनी अनेक पुस्तकेही लिहिली.१८८३ मध्ये स्त्रियांना शिक्षण देण्याच्या महान कार्यासाठी त्यांना तत्कालीन ब्रिटिश भारतीय सरकारने स्त्री शिक्षणाचे जनक म्हणून गौरवले.२८ नोव्हेंबर १८९० रोजी वयाच्या ६३ व्या वर्षी पुणे येथे त्यांचे निधन झाले.


समस्त बहुजन समाजाच्या कल्याणासाठी शिक्षणाची दारे खुली करणारे,ऋषितुल्य व्यक्तिमत्व,क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांचे जीवनकार्य आमच्यासाठी पिढ्यानपिढ्या आदर्श राहील.महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुण्यतिथी निमित्त विनम्र अभिवादन.!

# महात्मा जोतीराव फुले !

भारताचे थोर सुपुत्र, विचारवंत, समाजसुधारक, लेखक महात्मा जोतीराव फुले यांचा आज स्मृतिदिन. महात्मा जोतीराव फुले यांचा जन्म ११ एप्रिल १८२७ रोजी झाला. जोतीरावांच्या वडिलांचे नाव गोविंदराव तर आईचे नाव चिमणाबाई असे होते. सातारा जिल्ह्यातील कटगुण हे त्यांचे मूळ गाव. त्यांचे आडनाव गोऱ्हे असे होते पण त्यांच्या वडिलांचा फुले विक्रीचा व्यवसाय होता त्यामुळे ते फुले म्हणूनच ते ओळखले जाऊ लागले पुढे फुले हेच आडनाव रूढ झाले. काही दिवसांनी कटगुणहुन त्यांचे कुटुंबीय पुरंदर तालुक्यातील खानवडी येथे आले. खानवडी येथे त्यांचे घर असून त्यांच्या नावे सात बाराचा उतारा देखील आहे. प्राथमिक शिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांनी भाजी विक्रीचा व्यवसाय केला. जोतीराव फुले यांना लहानपणापासून शिक्षणाची आवड होती. १८४२ साली त्यांनी पुण्याच्या स्कॉटिश मिशन हायस्कूलमध्ये माध्यमिक शिक्षण घेण्यासाठी प्रवेश घेतला. अतिशय तल्लख बुद्धीच्या जोतिरावांनी पाच सहा वर्षातच तो अभ्यासक्रम पूर्ण केला. २३ सप्टेंबर १८७३ रोजी महात्मा फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. तथाकथित सनातनी उच्चवर्णीय लोकांकडून सर्वसामान्य लोकांवर होणारा अन्याय अत्याचार दूर करणे तसेच गुलामगिरीतून शूद्रातिशूद्र समाजाची मुक्तता करणे व त्यांना त्यांच्या हक्काची जाणीव करुन देणे हे सत्यशोधक समाजाचे ध्येय होते. 'सर्वसाक्षी जगतप्ती। त्याला नकोच मध्यस्ती।। ' हे या समाजाचे घोषवाक्य होते. सत्यशोधक समाजाने गुलामगिरीविरुद्ध आवाज उठवला आणि समाज न्यायाची व सामाजिक पुनर्रचनेची मागणी केली. या समाजातर्फे पुरोहितांशीवाय लग्न लावण्यास सुरवात केली. मराठीत मंगलाष्टके रचली. समाजातील तळागाळातील लोकांपर्यंत शिक्षण पोहचवणे हे सत्यशोधक समाजाचे महत्वाचे ध्येय होते. महात्मा फुले यांनी एका कवितेत शिक्षणाचे महत्व पटवून देताना म्हटले आहे की,

**विद्येविना मती गेली ।**<br>
**मतिविना नीती गेली।**<br>
**नितीविना गती गेली ।**<br>
**गतिविना वित्त गेले ।**<br>
**वित्ताविना शूद्र खचले ।**<br>
**इतके अनर्थ एका अविद्येने केले ।।**

एक महिला शिकली तर संपूर्ण कुटुंब शिकते. समाज शिक्षित करायचा असेल आणि बहुजन समाजात शिक्षण मुहूर्तमेढ रोवयची असेल तर महिलांना शिक्षित व्हायलाच हवे असे त्यांचे मत होणे म्हणूनच त्यांनी त्याची सुरवात स्वतःच्या घरापासून केली. जोतिरावांनी त्यांच्या पत्नी सावित्रीबाईंना शिक्षण देऊन शिक्षण कार्यास प्रवृत्त केले. महात्मा फुले यांनी १९४८ साली पुण्यातील भिडे वाड्यात मुलींची पहिली शाळा काढून तेथील शिक्षिकेची जबाबदारी सावित्रीबाईंवर सोपवली. पुढे सावित्रीबाई या शाळेच्या मुख्याध्यापिकापदी आरूढ झाल्या.शाळेच्या मुख्याध्यापकपदी आरूढ झालेली भारतातील पहिली महिला म्हणजे सावित्रीबाई फुले त्याचप्रमाणे मुलींसाठी पहिली शाळा काढणारे पहिले भारतीय म्हणजे महात्मा जोतीराव फुले. महात्मा जोतीराव फुलेंनी देशात मुलींच्या शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली. आज सर्वच क्षेत्रात महिला आघाडीवर आहेत असे कोणतेच क्षेत्र नाही की ज्यात महिलांनी आपला झेंडा रोवला नाही. कला, क्रीडा, साहित्य, विज्ञान, तंत्रदान, शिक्षण, समाजकारण, राजकारण,



अर्थकारण अशा सर्वच क्षेत्रात महिला आघाडीवर आहेत त्या केवळ आणि केवळ फुले दाम्पत्यांमुळे. महिलांसाठी फुले दाम्पत्यांनी जे कार्य केले ते ३३ कोटी देवांनीही केले नाही.


महात्मा फुले यांनी पुण्यातील वेताळ पेठेत १८५२ साली अस्पृश्यांसाठी शाळा स्थापन केली. त्यांच्या या शैक्षणिक कार्याला सनातन्यांनी खूप वविरोध केला. मुलींनी शिक्षणासाठी घराबाहेर पडणे म्हणजे धर्म बुडणे अशी आरोळी ठोकत सनातनी लोकांनी महात्मा फुले यांच्या या महान कार्यास विरोध केला. त्यांना मारण्यासाठी मारेकरी पाठवले पण महात्मा फुले डगमगले नाहीत. ते आपल्या भूमिकेवर ठाम राहिले. महात्मा जोतीराव फुले यांना वाचनाची खूप आवड होती. विवीध महापुरुषांचे जीवनचरित्र वाचणे व त्यातून प्रेरणा घेणे हा त्यांचा आवडीचा छंद. छत्रपती शिवाजी महाराजांचे चरित्र व थॉमस पेन या विचारवंतांच्या राईट ऑफ थॉट्स या ग्रंथाचा त्यांच्यावर खूप प्रभाव पडला. बहुजन समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा आणि दारिद्र पाहून ते खूप अस्वस्थ होत. जातपात, अस्पृश्य- स्पृश्य भेदभाव पाहून त्यांना खूप राग येत. समाजातील अज्ञान अंधश्रद्धा दूर करून समाजातील जातीभेद नष्ट करण्याचा त्यांनी निश्चय केला.

कोणताही धर्म ईश्वराने निर्माण केलेला नाही आणि चातुर्वर्ण्य व जातीभेद ही निर्मिती मानवाचीच आहे असे त्यांचे रोखठोक मत होते. सर्व मानव एकच आहेत म्हणून सर्वांनी गुण्यागोविंदाने राहावे असे त्यांचे मत होते. त्यांनी लिहिलेल्या शेतकऱ्यांचा आसूड या पुस्तकातून महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची विदारक दुर्दशा आणि दारिद्र्याची वास्तवता विशद केली आहे. या पुस्तकाद्वारे विशाल दृष्टिकोनाचे क्रांतिकारक म्हणून महात्मा फुलेंचे दर्शन होते. महात्मा फुले यांनी सार्वजनिक सत्यधर्म हा ग्रंथ लिहिला. हा ग्रंथ सत्यशोधक समाजाचा प्रमाण ग्रंथ मानला जातो. तुकारामांच्या अभांगाचा त्यांना गाढा अभ्यास होता. अभंगाच्या धर्तीवर त्यांनी अनेक अखंड रचले. त्यांना सामाजिक विषमतेचे जागतिक भान होते म्हणूनच आपला गुलामगिरी हा ग्रंथ त्यांनी अमेरिकेतील कृष्णवर्णीयांना समर्पित केला. अस्पृश्यांची कैफियत हा त्यांचा अप्रकाशित ग्रंथ आहे. २८ नोव्हेंबर १८९० रोजी महात्मा फुले यांचे निधन झाले. आज त्यांच्या स्मृतिदिनी त्यांचे स्मरण करणे हे आपले कर्तव्यच आहे. महात्मा फुलेंना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

**- श्याम ठाणेदार**<br>
**दौंड जिल्हा पुणे**<br>
**९९२२५४६२९५**

# महात्मा फुले : गुलामगिरी ग्रंथकार

स्त्री अथवा पुरुष जे शेतकरी अथवा कलाकौशल्य करून पोटे भरण्यात जन्म सार्थक मानतात, परंतु शेतकरी वगैरेंना मदत करणाऱ्यांचा आदरसत्कार करतात, त्यास सत्यवर्तन करणारे म्हणावे, असा महात्मा फुले यांनी मानवास सत्यधर्माचा बोध केला. त्यातील काही वचने आपण वाचली की लक्षात येते, की त्यांचा आवाका किती मोठ्ठा होता? त्यांना अखिल विश्वाला कवेत घेणाऱ्या माणसाला माणूस म्हणून प्रतिष्ठा देणारा धर्म साकार करायचा होता. आधुनिक भारतामध्ये सामाजिक पुनर्घटनेसाठी चळवळ सुरू करणारी पहिली संस्था म्हणजे सत्यशोधक समाज होय. सत्यशोधक समाजाने सामाजिक गुलामगिरीविरुद्ध आवाज उठवला. सामाजिक न्यायाची व सामाजिक पुनर्रचनेची मागणी केली. सत्यशोधक समाजाचा आवाज ही भारतात अनेक शतके दडपून टाकलेल्या कनिष्ठ समाजाची किंकाळी होय. वेद हे ईश्वरनिर्मित नसून ते मानवनिर्मित आहेत, असे जोतीरावांचे ठाम मत



होते. वेदाने समाजात भेद पडले. म्हणून वेद म्हणजे भेद असे त्यांना वाटे. पोथीतील जातींच्या उत्पत्तीविषयीची कल्पना त्यांना मुळीच मान्य नव्हती. ब्रह्मदेवाच्या मुखातून ब्राह्मण जन्मले, क्षत्रिय बाहुतून जन्मले, शूद्र त्याच्या पायातून निघाले हे विधान त्यांना भयंकर आणि धादांत असत्य वाटे. मनुस्मृती ही शूद्रांच्या बोकांडी गुलामगिरी बसविते म्हणून ती अपवित्र आहे, असे म्हणून त्यांनी मनुस्मृतीचा धिक्कार केला. भ.बुद्धाविषयी जोतिरावांना नितांत आदर वाटे.

शेतकऱ्यांचे आसूड हा त्यांचा प्रसिद्ध ग्रंथ होय. तत्कालीन समाजातील जातिभेद अनिष्ट प्रथा, तसेच समाजातील उच्चवर्णीयांची मक्तेदारी याविरुद्धची प्रतिक्रिया त्यांच्या साहित्यातून उमटलेली होती. त्याकाळच्या समाजाला प्रबोधनाची व सामाजिक परिवर्तनाची वाट दाखविण्यासाठी त्यांनी लिहिलेले ग्रंथ हे मार्गदर्शक व प्रेरणादायी ठरले. समताधिष्ठित समाजाच्या निर्मितीमध्ये त्यांनी मोलाचे योगदान दिले. त्यांचे कार्य समाजाला प्रेरणादायी असल्याचे सर्वमान्य आहे. त्यांनी दिलेल्या शिक्षणाच्या बीजमंत्राने बहुजन समाज खडबडून जागा झाला. त्यांचे ते शिक्षणाचे महत्त्व पटवून देणारे मंत्र- ओळी सर्वांना तोंडपाठ झाल्या आहेत-

**विद्येविना मती गेली। मतीविना नीती गेली। नीतीविना गती गेली। गतीविना वित्त गेले। वित्ताविना शूद्र खचले। इतके अनर्थ एका अविद्येने केले।।**

जोतिबा फुलेजींचे मूळ गाव सातारा जिल्ह्यातील कटगुण हे होते. त्याच गावी त्यांचा जन्म दि. ११ एप्रिल १८२७ रोजी झाला. जोतिबांच्या वडिलांचे नाव गोविंदराव आणि आईचे नाव चिमणाबाई होते. शेवटच्या पेशव्यांच्या काळात महात्मा फुलेजींचे वडील आणि दोन चुलते फुले पुरवण्याचे काम करीत होते. त्यामुळे गोरे हे त्यांचे मूळ आडनाव असले तरी पुढे ते फुले म्हणून ओळखले जाऊ लागले. तेच नाव पुढे रूढ झाले. जोतीरावजी केवळ नऊ महिन्यांचे होते, तेव्हा त्यांच्या आईचे निधन झाले. जोतीबांचा विवाह वयाच्या तेराव्या वर्षी सावित्रीमाईंशी झाला. प्राथमिक शिक्षणानंतर काही काळ त्यांनी भाजी विक्रीचा व्यवसाय केला. इ.स.१८४२मध्ये माध्यमिक शिक्षणासाठी पुण्याच्या स्कॉटिश मिशन हायस्कूलमध्ये त्यांनी प्रवेश घेतला. बुद्धी अतिशय तल्लख, त्यामुळे पाच-सहा वर्षातच त्यांनी अभ्यासक्रम पूर्ण केला. ग्रामची या प्रसिद्ध तत्ववेत्त्याने महात्मा फुले यांना सेंद्रिय बुद्धिवंत असे संबोधले आहे. जोतिराव करारी वृत्तीचे होते. त्यांस गुरुजनांविषयी व वडीलधाऱ्या माणसांविषयी फार आदर वाटत असे. ते आपला अभ्यास मन लावून करत असत. परीक्षेत त्यांना पहिल्या श्रेणीचे गुण मिळत असत. शाळेतील शिस्तप्रिय व हुशार विद्यार्थी म्हणून त्यांचा नावलौकिक होता. पुढे महात्मा फुलेजींनी मुलींच्या शिक्षणासाठी अतोनात प्रयत्न केले. त्यांनी मुलींसाठी तद्वतच अस्पृश्य मुलांसाठी देखील शाळा सुरू केली. त्यांना स्त्री शिक्षणाची प्रेरणा मावस बहीण- सगुणाबाई क्षिरसागर यांच्याकडून मिळाली. बहुजन समाजाचे अज्ञान, दारिद्र्य आणि समाजातील जातिभेद पाहून त्यांनी ही सामाजिक परिस्थिती सुधारण्याचा निश्चय केला. त्यांनी इ.स.१८४८ साली पुण्यामध्ये बुधवार पेठेतील भिडे वाड्यात महाराष्ट्रातील मुलींची पहिली मराठी शाळा काढली. तेथील शिक्षिकेची जबाबदारी पत्नी- क्रांतिज्योती सावित्रीमाईंवर सोपविली. त्यांच्या सोबतीला ज्ञानज्योती फातिमाबी शेख सावलीसारख्या होत्या. यानंतर जोतिबांनी अस्पृश्यांसाठी शाळा सुरू केल्या.

त्यावेळी पुण्यात बरेच कबीरपंथी फकीर येत असत. चांगले लिहायला व वाचायला येणाऱ्या जोतिबांकडून रोज संतश्रेष्ठ कबीरांचा बीजमती हा ग्रंथ वाचून घेत असत. त्यामुळे त्यांच्या मनावर संत विचारांची शिकवण चांगलीच बिंबली. अनेक दोहे त्यांना पाठ झाले. त्यातील एक-

नाना वर्ण एक गाय, एक रंग है दूध! तुम कैसे बम्मन, हम कैसे क्षूद!!

कोणताही धर्म ईश्वराने निर्माण केलेला नाही आणि चातुर्वण्य व जातिभेद ही निर्मिती मानवाचीच आहे, असे रोखठोकपणे बोलत. मात्र या विश्वाची निर्मिती करणारी कोणती तरी गुप्तशक्ती आहे, अशी त्यांची विचारसरणी होती. मानवाने गुण्यागोविंदाने रहावे, असे त्यांचे मत होते. त्यांनी लिहिलेल्या शेतकऱ्याचा आसूड या पुस्तकातून महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची विदारक दुर्दशा आणि दारिद्र्याची वास्तवता विशद केली आहे. या पुस्तकाद्वारे विशाल दृष्टिकोनाचा क्रांतिकारक म्हणूनही जोतीरावांचे दर्शन होते. नीती हाच मानवी जीवनाचा आधार आहे, हा विचार मांडणारे जोतीराव एक तत्त्वचिंतक व्यक्तिमत्त्व होते. महात्मा फुलेंनी सामाजिक प्रबोधन करण्यासाठी शेतकऱ्यांचा आसूड, गुलामगिरी आदी ग्रंथ लिहून सामाजिक प्रबोधन केले. मूलभूत मानवी हक्कांच्या आधारावरून विश्वकुटुंब कसे निर्माण होईल? त्याकरिता कशा प्रकारचा वर्तनक्रम व वैचारिक भूमिका स्वीकारली पाहिजे? हे जोतीराव फुलेंनी आपल्या सार्वजनिक सत्यधर्म संहितेत अनेक वचनांच्या आधारे मांडले आहे-

धर्म राज्य भेद मानवा नसावे। सत्यानें वर्तावें। ईशासाठीं।। सर्व सुखी व्हावे भिक्षा मी मागतों। मनुजा सांगतो। जोती म्हणें।। (महात्मा फुले समग्र वायय: सार्वजनिक सत्य धर्म पुस्तक: अखंड- पृ.क्र.५५९.)

बहुजन समाजातील विषमता नष्ट करणे व तळागाळातील मुलांपर्यंत शिक्षण पोहचवणे, हे सत्यशोधक समाजाचे ध्येय होते. वेदांना झुगारून जोतिबांनी हे कार्य करण्यास सुरवात केली. त्यांनी जातीय भेद आणि चातुर्वर्णीय भेदभावास विरोध करण्यास सुरूवात केली. तेव्हा स्त्री विभागाचे नेतृत्व सावित्रीमाई फुले यांनी केले. त्यांच्याबरोबर १९ स्त्रिया सत्यशोधक समाजाचे कार्य करीत होत्या. त्याचवेळी त्या एका कन्याशाळेच्या शिक्षिकाही होत्या. त्यानंतर मुख्याध्यापिकाही झाल्या. छ.शाहू महाराजांनी या सत्यशोधक चळवळीस पाठिंबा दिला होता. न्याय, अत्याचार व गुलामगिरी यांपासून शूद्रातिशूद्र समाजाची मुक्तता व त्यांना हक्काची जाणीव करून देणे, हे सत्यशोधक समाजाचे ध्येय होते. या समाजाने पुरोहितांशिवाय विवाह लावण्यास सुरुवात केली. तेही स्वरचित मंगळाष्टके उच्चारून-

देवाचे नियमां प्रमाण धरुनी, चालें तुझें कूळ गे।। सत्यानें अवघ्यांत श्रेष्ठ असशी, तैसेच हे त्वत्सगे।। अज्ञान्या समदृष्टिनें शिकविशी, तूं ज्ञान त्या दाविशी।। प्रीतीनें वरितों तुला अजि तुझी, ऐकून कीर्ति अशी।। .... शुभमंगल सावधान।।१।। (महात्मा फुले समग्र वायय: सत्यशोधक समाजोक्त पूजा-विधी: मंगळाष्टक-वर: पृ.क्र.४३४.)

जोतिबा फुलेजींना मुंबईच्या जनतेनेच महात्मा ही पदवी बहाल केली होती. ही पदवी त्यांना इ.स.१८८८ साली मिळाली. महाराष्ट्राला तीन प्रमुख समाजसुधारकांचा वैचारिक वारसा लाभला असल्यामुळे या राज्यास फुले-शाहू-आंबेडकरांचा महाराष्ट्र असे म्हणतात. दि.२४ सप्टेंबर १८७३ रोजी त्यांनी आपल्या अनुयायांसह सर्व जातीतील लोकांना समान हक्क मिळवण्यासाठी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. यात सर्व जाती धर्मातील लोकांनीं एकत्रित येऊन उत्पीडित वर्गाच्या उन्नतीसाठी काम केले. तर-

**सर्वसाक्षी जगत्पती। त्याला नकोच मध्यस्ती।।**

हे या समाजाचे घोषवाक्य होते. सर्वसामान्यांचे कैवारी शिक्षणसम्राट महात्मा जोतीरावजी फुले हे दि.२८ नोव्हेंबर १८९० रोजी पुणे येथे निर्मिकांकी कायमचे विसावले. आज सर्वत्र त्यांचा पावन स्मृतिदिन खरा शिक्षकदिन मानून बहुजन समाजातर्फे गावोगावी आठवडाभर विविध कार्यक्रम राबविण्यात येतात. तो आता शासन दरबारीही लागू होण्याची प्रतिक्षा आहे, हे येथे उल्लेखनीयच!

**!! पावन स्मृतिनिमित्त त्यांच्या चरणकमली या लेकरांचे कोटी कोटी विनम्र अभिवादन !!**

**- जोतिबांचा लेकरू -**<br>
**श्री.कृष्णकुमार लक्ष्मी-गोविंदा निकोडे.**<br>
**मु. पिसेवडधा, जि. गडचिरोली.**<br>
**फक्त व्हॉट्सअॅप- ९४२३७१४८८३**

## सत्कार..

जेत्यांचा सर्वांसमक्ष<br>
आनंदे करा सत्कार<br>
पाहू द्या जन मानसा<br>
आपण कसे दिलदार

बदलू शकेल जनमत<br>
घडे अद्भुत चमत्कार<br>
भलेएकांतात निवांत<br>
सोडे क्रुधीत फुत्कार

अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

का हारलो अकस्मात<br>
करावा गंभीर विचार<br>
नकोबोलणेअद्वातद्वा<br>
दिसू नये बा अविचार

दोष देताना यंत्रणेला<br>
शास्त्रशुद्ध हवा प्रचार<br>
मिडीया सवाल उलटे<br>
बवाल माते अपप्रचार

सहानुभूती लाटआणू<br>
नाही सत्तेला लाचार<br>
निस्पृह करी जनसेवा<br>
दर्शाव नाटकी आचार

वाट पाहे योग्यवेळेची<br>
मग खरपूस समाचार<br>
प्रतिमा अशी बनवावी<br>
मिळो सक्षम जनाधार

**- हेमंत मुसरीफ, पुणे**<br>
**९७३०३०६९९६**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# स्वच्छ प्रतिमा असणाऱ्या संजय केळकरांना मंत्रिपद द्यावे

## भाजपा ठाणे शहर/जिल्हा उपाध्यक्ष गाडे यांची मागणी

**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.२७, कोपरी (ठाणे) :** ठाणे शहर विधानसभा मतदारसंघातून सलग तीनवेळा निवडून येत, विजयी हॅट्रिक साधणारे भाजपचे संजय केळकर हे स्वच्छ प्रतिमा असणारे आणि तळागाळातील कार्यकर्त्याला सोबत घेऊन चालणारे लोकप्रतिनिधी अशी त्यांची ओळख असून अशा बहुजनहित जपणाऱ्या संजय केळकर यांना मंत्रिमंडळात मानाचे स्थान देत. त्यांच्या ज्येष्ठत्त्वाचा सन्मान राखण्यात यावा.

अशी आग्रही मागणी भाजपाचे ठाणे शहर/जिल्हा उपाध्यक्ष राजेश गाडे यांनी प्रसिद्धी माध्यमांशी बोलताना केली आहे. कोकण पदवीधर मतदारसंघातून विधानपरिषदेवर आमदारकी भूषविल्यानंतर, संजय केळकर यांनी ठाणे शहर विधानसभा मतदारसंघात हॅट्रिक साधून आपले निर्विवाद नेतृत्त्व सिद्ध करुन दाखविलेले आहे. माझ्यासारख्या आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्त्याला, भारतीय जनता पक्षासारख्या राष्ट्रीय पक्षात



जी काम करण्याची संधी मिळालीय, ती केवळ संजय केळकर यांच्यामुळेच. समाजातील सर्व घटकांना सोबत घेऊन जाणारा नेता, अशी सर्वमान्य ओळख असणारा अभ्यासू लोकप्रतिनिधी, सलग तिसऱ्यांदा ऐतिहासिक अशा श्रीस्थानकाला लाभलेला आहे आणि म्हणूनच ठाणे शहरातील आंबेडकरी जनतेची अशी मागणी आहे की, ठाणे विधानसभा मतदारसंघाचे 'हॅट्रिक'वीर अशी ओळख निर्माण झालेल्या संजय केळकर यांना, मानाचे मंत्रिपद भूषवण्याची संधी देण्यात यावी. असेही राजेश गाडे यांनी यावेळी बोलताना स्पष्ट केले. दरम्यान, आमदारकीची हॅट्रिक साधून ठाण्यासारख्या सांस्कृतिक शहरात भाजपाची मुळे पूर्वीपेक्षा ही अधिक घट्ट झाली असून ठाणे महानगरपालिकेत आता कमळ फुलविल्याशिवाय आम्ही स्वस्थ बसणार नसल्याचे स्पष्ट प्रतिपादन राजेश गाडे यांनी यावेळी केले. गेल्या ३० वर्षांपासून राज्यात भाजपा-शिवसेना युती असूनही ठाणे शहराचा महापौर, भारतीय जनता पक्षाच्या नशिबी नव्हता. मात्र, संजय केळकर यांना मंत्रिपद मिळाल्यास, महापालिकेवर भाजपाचाच महापौर बसेल, याबाबत आपल्या मनात कोणताही संदेह नसल्याचा आत्मविश्वास गाडे यांनी यावेळी बोलून दाखवला.

संजय केळकर हे उच्चशिक्षित, संयमी आणि अठरापगड जाती-समाजातील कार्यकर्त्यांना सोबत घेऊन चालणारे सुसंस्कृत नेतृत्त्व असून, त्यांचे आजोबा बॅरिस्टर बर्वे हे, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे खंदे समर्थक आणि सहकारी होते. उल्लेखनीय बाब म्हणजे, बर्वे यांनी बाबासाहेबांना साथ दिल्यामुळे तत्कालीन कर्मठांनी, त्यांना वाळीत ही टाकले होते. कोकणस्थ ब्राह्मणांच्या बालेकिल्ल्यात स्नेहभोजन आयोजित करुन, सामाजिक समतेच्या आड येणारे अडथळे दूर करण्याचा प्रयत्न केल्याबाबत, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या 'बहिष्कृत भारत' या नियतकालिकात बॅरिस्टर बर्वे यांचे कौतुकही केलेले आहे. अशा, खऱ्याअर्थाने पुरोगामी वारसा लाभलेल्या घराण्यातून आलेल्या संजय केळकर यांना मंत्रिपद मिळाल्यास, ठाणे शहराचा विकास, मुलभूत सुखसोयी व नागरीसमस्या चुटकीसरशी सुटतीलच, त्याचबरोबर भविष्यातील खरीखुरी 'स्मार्टसिटी' म्हणून नावारुपाला येण्यासाठी, संजय केळकर यांना, ठाण्यातून मंत्रिपद मिळालेच पाहिजे, अशी आग्रही मागणी करतानाच, यासंदर्भात आपण एक 'स्वाक्षरी-मोहीम' राबविणार असल्याचेदेखील भाजपाचे ठाणे शहर/जिल्हा उपाध्यक्ष राजेश गाडे यांनी, शेवटी प्रसिद्धीमाध्यमांशी बोलताना स्पष्ट केले आहे.

# टाकळी ढोकेश्वर गटात काशिनाथ दातेंना पसंती

## सुजित झावरे पाटील यांचा बोलबाला कायम



सुजित झावरे यांची निर्णायक भूमिका आमदार काशिनाथ दाते यांना जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुजित झावरे पाटील यांची मोलाची साथ मिळाली. सुजित झावरे यांच्यामुळे टाकळी ढोकेश्वर आणि ढवळपूरी गटाने मोठे मताधिक्य मिळवून दिले. टाकळी ढोकेश्वर, कर्जुले हर्य, वासुंदे, पोखरी, खडकवाडी, पळसपूर, काकणेवाडी, कासारे, सावरगाव परिसर व ढवळपूरी, वनकुटे, भाळवणी, गावडेवाडी तास परिसरातील गावांची मोलाची मतांची साथ मिळाली. त्यामुळे काशिनाथ दाते यांचा विजय अधिक सोपा झाल्याची चर्चा परिसरातून होत आहे.

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२७, पारनेर (अहिल्यानगर)** : पारनेर तालुक्यातील प्रत्येक निवडणुकीत विजयी कोणाला व्हायचं हे नेहमी टाकळी ढोकेश्वर गटच ठरवत असतो. असाच एक अनोखा अनुभव पुन्हा एकदा पारनेर नगर विधानसभा मतदारसंघामध्ये पारनेर तालुक्यातून आमदार काशिनाथ दाते यांना मिळालेल्या मताधिक्यापेक्षाही टाकळी ढोकेश्वर आणि ढवळपूरी जि.प. गटातून सर्वाधिक मताधिक्य मिळाले. त्यामुळे टाकळी ढोकेश्वर आणि ढवळपूरी गटावर तालुक्याचे नेते सुजित झावरे पाटील यांचेच वर्चस्व असल्याचे या निवडणुकीच्या निमित्ताने पुन्हा एकदा मतदानाच्या आकडेवारीवरून स्पष्ट होत आहे.

पारनेर - नगर विधानसभा मतदारसंघाचा निकाल नुकताच लागला असून यामध्ये महायुतीचे काशिनाथ दाते सर यांनी राणी लंके यांच्या विरोधात चुरशीने वर्चस्व प्रस्थापित केले. या निवडणुकीमध्ये टाकळी ढोकेश्वर जिल्हा परिषद गट राजकीयदृष्ट्या महत्त्वाचा मानला गेला.

आदिवासी, दुर्गम, पठार भागातील असलेला टाकळी ढोकेश्वर आणि ढवळपूरी गटाने ज्या बाजूने कौल दिला तोच उमेदवार निवडून आल्याचे चित्र अनेक निवडणुकीत पहावयास मिळाले आहे. त्याप्रमाणे याही विधानसभेच्या निवडणुकीत असेच चित्र स्पष्ट झाले आहे. टाकळी ढोकेश्वर आणि ढवळपूरी जि.प.गटावर गेल्या काही वर्षांपासून जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुजित झावरे पाटील यांचे कायमच वर्चस्व राहिले आहे.

त्याचबरोबर संपूर्ण तालुक्यात त्यांचे कार्यकर्ते व जनसंपर्क यामुळे या निवडणुकीमध्ये मोठी निर्णायक भूमिका बजावल्याचे परिसरातून बोलले जात आहे.

# एकत्रित माध्यम कक्षांतर्गत अधिकारी-कर्मचाऱ्यांचा सत्कार सोहळा संपन्न

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२७, ठाणे** : विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ नुकतीच संपन्न झाली असून या निवडणूक कालावधीत जिल्हा माहिती कार्यालय, ठाणे येथे एकत्रित माध्यम कक्षाची स्थापना करण्यात आली होती. त्याचप्रमाणेसंपूर्ण ठाणे जिल्ह्यातील१८विधानसभा मतदारसंघातमाध्यम कक्षांची देखील स्थापना करण्यात आली होती.

या माध्यम कक्षांच्या माध्यमातून १८ विधानसभा मतदारसंघात निवडणूकविषयक सर्व कामकाज सुरळीत पाडण्यासाठी जिल्हा माहिती कार्यालय, ठाणे येथून जिल्हा माहिती अधिकारी तथा नोडल अधिकारी, एकत्रित माध्यम कक्ष तथा सदस्य सचिव, माध्यम प्रमाणिकरण व संनियंत्रण समिती, ठाणे मनोज शिवाजी सानपतसेच माहिती अधिकारी नंदकुमार वाघमारे यांनी माध्यम कक्षातील सर्व नोडल अधिकारी-कर्मचाऱ्यांसोबत उत्तम समन्वय साधला.

विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीच्या कामकाजात माध्यम कक्षातील सर्व नोडल अधिकारी, एकत्रित माध्यम कक्षतसेच माध्यम प्रमाणिकरण व संनियंत्रण समितीच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांनी उत्तम कामगिरी केल्याबद्दल आज जिल्हा माहिती कार्यालय, ठाणे येथे या सर्व अधिकारी-कर्मचाऱ्यांचा सत्कार सोहळा संपन्न झाला.

यावेळी माध्यम कक्षातील सर्व नोडल अधिकारी,एकत्रित माध्यम कक्षतसेच माध्यम प्रमाणिकरण व संनियंत्रण समितीच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांचा प्रमाणपत्र देवून सत्कार करण्यात आला. ठाणे जिल्ह्यातील १८ विधानसभा मतदारसंघातील माध्यम



कक्ष,एकत्रित माध्यम कक्षतसेच माध्यम प्रमाणिकरण व संनियंत्रण समितीचे कामकाज यशस्वीपणे पूर्ण करण्याकरिता जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी अशोक शिनगारे, उपजिल्हा निवडणूक अधिकारी वैशाली माने, सर्व नोडल अधिकारी, सर्व निवडणूक निर्णय अधिकारी, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी, जिल्हा निवडणूक प्रशासनातील सर्व अधिकारी-कर्मचारी, प्रेस ट्रस्ट ऑफ इंडियाचे ज्येष्ठ पत्रकार एस.रामकृष्णण अय्यर, समाज माध्यम तज्ञ प्रसाद कुलकर्णी व प्रसारमाध्यमांचे मोलाचे सहकार्य लाभले.

या कार्यक्रमासठाणे जिल्ह्यातील १८ विधानसभा मतदारसंघातील माध्यम कक्ष, एकत्रित माध्यम कक्षतसेच माध्यम प्रमाणिकरण व संनियंत्रण समितीचे सदस्य उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जिल्हा परिषदेच्या सहाय्यक प्रशासक अधिकारी कल्पना रविंद्र तोरवणे यांनी केले.

## राजेंद्र विद्यालयात बालविवाह मुक्त भारत या कार्यक्रमाचे आयोजन

**अक्षराज : धर्मेंद्र वर्पे**

**दि.२७, खंडाळा (सातारा)** : राजेंद्र माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय यामध्ये या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रम प्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना विद्यालयाचे प्राचार्य शब्बीर नालबंद



म्हणाले की, बालविवाहाला प्रतिबंध करणे ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे या सामाजिक कामासाठी प्रशासनास संपूर्ण सहकार्य करणे आवश्यक आहे. या प्रसंगी बालविवाह प्रतिबंध प्रतिज्ञेचे वाचन प्रवीण बोरगावे यांनी केले. या कार्यक्रमाचे नियोजन सांस्कृतिक विभागातील जयप्रकाश गेजगे व सोमनाथ गर्जे यांनी केले. या कार्यक्रमास विद्यालयाचे प्राचार्य शब्बीर नालबंद, उपप्राचार्य अरुंधती गाढवे, उपमुख्याध्यापिका सुशीला मोहिते, पर्यवेक्षक धनंजय महामुनी तसेच शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## तरुणाईने गावागावातून संविधान साक्षरता मंडळ स्थापन करुन मूल्यविचार रुजवावा - प्रा.इनामदार

**अक्षराज : धर्मेंद्र वर्पे**

**दि.२६, खंडाळा (सातारा)** : सुशिला शंकरराव गाढवे महाविद्यालय, खंडाळा २६ नोव्हेंबर २०२४ राज्यशास्त्र विभाग आयोजित भारतीय संविधान दिनानिमित्त संविधान उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. अक्षय आशा देशमाने, भागवत बिरगड (बी.ए भाग ०२) यांनी उद्देशिकेचे वाचन केले.भारतीय संविधान दिनाचे महत्व अधोरेखित करताना राज्यशास्त्र विभागप्रमुख प्रा.अमीर इनामदार म्हणाले, भारतीय माणसांनी भारतीय माणसांच्या कल्याणासाठी निरपेक्ष भावनेतून संविधान ग्रंथाची निर्मिती केली.

भारतीय संविधान केवळ ग्रंथ नसून प्रत्येक नागरिकांच्या मूलभूत हक्काची आणि कर्तव्यांची तरतूद करण्यात आली आहे. वर्तमानात तरुणाईने संविधान साक्षरतेसाठी गावागावातून संविधान साक्षरता मंडळ स्थापन करावीत आणि सक्रिय व्हावं,जनमाणसात संविधानाचा मूल्यविचार रुजवावा,ही काळाची गरज आहे.

# थोडक्यात

## नवनिर्वाचीत आमदार काशिनाथ दाते यांना सुपा गटातून शुभेच्छा

**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.२७, सुपा (अहिल्यानगर) :** नगर विधान सभेची निवडनुक ही अतिशय अटीतटीची झाली असुन नवनिर्वाचीत आमदार म्हणून काशिनाथ दाते हे मताधिक्याने निवडुन आले. पारनेर नगर मतदार संघातुन अनेक निष्टावंत कार्यकर्ते



यांच्याकडुन स्वागत होत असतांना दिसते. त्यापैकी सुपा, वाडेगव्हाण गटातून चांगल्या प्रकारची मते मिळवुन देणारे सुपा येथील जेष्ट कार्यकर्ते, सेवा सोसायटीचे चेअरमन दिलीप पवार आणि राष्ट्रवादी पक्षाचे (अजित पवार गट) तालुका अध्यक्ष विक्रम कळमकर, पारनेर तालुका भाजपाचे सरचिटनिस सागर मैड, रायतळे गावचे निष्टावंत कार्यकर्ते मिठुशेट येणारे यांनी नवनिर्वाचीत आमदार दाते यांचे पुष्पगुच्छ देउन स्वागत केले. आमदार दाते यांनी विकास कामाबद्दल कोठेही कमी पडणार नाही म्हणून आश्वासन दिले.

## बीएसपी तर्फे संविधान दिन साजरा

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.२६, कोपरखैरणे (नवी मुंबई) :** बहुजन समाज पार्टी नवी मुंबई युनिट तर्फे सेक्टर ४, कोपरखैरणे, नवी मुंबई येथील बहुजन समाज पार्टीच्या जनसंपर्क कार्यालयात संविधान सन्मान दिन मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. स्वतंत्र भारताची लिखित स्वरूपात राज्यघटना लिहिणाऱ्या भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला बसपाचे नवीमुंबई अध्यक्ष प्रा. दत्ता हेगडे यांच्या हस्ते संविधान सन्मान दिनाच्या कार्यक्रमाला उपस्थित असणाऱ्या सर्व संविधान प्रेमींच्या तर्फे पुष्पहार अर्पण करून संविधान निर्मात्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. त्याचप्रमाणे ऐरोली विधानसभा उमेदवार तथा नवी मुंबई उपाध्यक्ष अरविंदसिंग राव आणि बेलापूर विधानसभा अध्यक्ष विनोद धुरंधर यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून संविधानाचा सन्मान करण्यात आला. त्यानंतर संविधानाच्या उद्देशिकाचे सामूहिक वाचन करण्यात आले. व संविधान दिनानिमित्त शुभेच्छा देण्यात आल्या. सदर कार्यक्रमास प्रा. दत्ता हेगडे, विनोद धुरंधर, उमेश राम, राजेश जैस्वार, दीपक बनसोडे, अशोक जगताप, बाळू भगत, मनोज कटलिंगे, आनंद मनोहर, ज्योती नरवडे, जे.के.पोळ. प्रियदर्शनी हेगडे, ज्येष्ठ नेते आण्णा थोरात यांच्यासह अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते, व संविधान प्रेमी नागरिक उपस्थित होते.

## दुधाचे दर कमी झाल्याने पशुपालकांमध्ये नाराजी

**अक्षराज : शरद भगत**

**दि.२७, बारामती :** नुकतीच महाराष्ट्राच्या विधानसभेची निवडणूक पार पडली. निकाल ही लागला अजून मुख्यमंत्री कोण होणार अशी चर्चा ही पारावर रंगू लागल्या. पण निकाल लागताच दुसऱ्याच दिवशी दुधाचे भाव ३ रुपयांनी कमी झाल्याने पशुपालक नाराज झालेले दिसत आहे. ग्रामीण भागात शेतीला जोड व्यवसाय म्हणून अनेक शेतकरी पशुपालन करत असतात. दुग्ध व्यवसायातुन आपला संसार चालवत असतात. परंतु दुधाचे दर अचानक कमी झाल्याने ग्रामीण भागातील दुग्ध उत्पादक शेतकऱ्यांचे आर्थिक बजट देखिल कोलमडले आहे. सतत पडणाऱ्या दुष्काळामुळे जनावरांना दुप्पट पैसे देऊन चारा विकत घेणे. याचबरोबर जनावरांची गोळी पेंडचे भाव देखील गगनाला भिडल्याने दुग्ध उत्पादक शेतकऱ्यांच्या हातात एक रुपया ही राहत नसल्याने शेतकऱ्यांनी नाराजी व्यक्त केली आहे.

## ऐरोलीतील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारकात संविधान उद्देशिकेचे समूह वाचन

**अक्षराज : जे.के. पोळ**

**दि.२७, ऐरोली (नवी मुंबई)** : ऐरोली येथील नवी मुंबई महानगर पालिकेचे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक हे ज्ञान हिच शक्ती या बाबासाहेबांच्या विचारांवर आधारित स्मारक म्हणून देशभरात ज्ञान केंद्र



म्हणून नावाजले जात आहे. लक्षावधी देशी परदेशी पर्यटकांनी या ठिकाणी भेट देत येथील अद्यावत समृध्द ग्रंथालय तसेच बाबासाहेबांचे जीवनचरित्र उलगडणारे छायाचित्र दालन व इतर सुविधांची मुक्तकंठाने प्रशंसा केली आहे.

या वर्षीचा संविधान दिन हा अमृत महोत्सवी विशेष असल्याने भारतीय संविधानास ७५ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त स्मारकास आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली होती. तसेच स्मारकातील सभागृहात संविधान उद्देशिकेच्या एकत्रित समुह वाचनाचा विशेष उपक्रम सेक्टर १५ ऐरोली येथील नवी मुंबई महानगर पालिकेच्या शाळेतील २८० विद्यार्थी व १० शिक्षक यांच्या समवेत राबविण्यात आला. या प्रसंगी उपआयुक्त संघरत्ना खिल्लारे यांच्या समवेत शालेय विद्यार्थी, शिक्षक तसेच स्मारकातील नमुंमपा अधिकारी, कर्मचारी यांनी संविधानातील उद्देशिकेचे समुह वाचन केले.

स्मारकातील ऑडिओ व्हिज्युअल ग्रंथालयात विशेष संविधान कक्ष निर्मिती करण्यात आली असून त्याठिकाणी संविधानाच्या मूळ प्रतिची प्रतिकृती ठेवण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे त्या कक्षामध्ये संविधानाशी संबधीत पुस्तके उपलब्ध करुन देण्यात आली आहेत. जेणे करुन संविधान अभ्यासकांना संविधानाविषयी सखोल अभ्यास करता येईल तसेच संविधान जाणून घेण्याची इच्छा असणाऱ्या वाचकांना संविधान विषयक सांगोपांग माहिती एकाच ठिकाणी उपलब्ध होऊ शकेल. संविधान दिनी १२०० हून अधिक पर्यटकांनी स्मारकाला भेट दिलेली असून ग्रंथालयातील स्वतंत्र संविधान कक्ष पाहून व्यवस्थापनाचे कौतुक केले आहे. त्याचप्रमाणे स्मारकातील विविध सुविधांची ही प्रशंसा केली आहे.